विद्यापीठ अनुदान आयोग नवीदिल्ली पुरस्कृत

एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

# भारतीय संसदीय लोकशाहीतील विरोधी राजकीय पक्षाची भूमिका

दि. १६ जुलै, २०१६




**संयोजक**

**राज्यशास्त्र विभाग**

**श्री सिध्देश्वर महाविद्यालय, माजलगाव**

(कला, विज्ञान व वाणिज्य)

ता.माजलगाव जि.बीड ४३१ १३१ (महा.)

E-mail - siddheshwar.college@gmail.com

Website : www.siddheshwarcollege.com

ISBN No. 978-1-945563-49-2

वाङ्मयं तप उच्यते

RADHEYA PUBLICATION

Scanned with CamScanner

| अ.क्र. | शोधनिबंधाचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ३१. | भारतीय जनता पक्षः आर्थिक प्रश्नांवरील भूमिका | डॉ. महेश प्रभाकरराव देशमुख | ८९ |
| ३२. | Need of Opposition Party in Democracy : Indian Review | Mr. Harsha Suryawanshi | ९३ |
| ३३. | The Role of Opposition Party in Indian Democracy | Mr. Arun S. Pentawar | ९७ |
| ३४. | The Role,Rights & Responsibility of Opposition in Democracy | Dr. R.K.Kale | १०० |
| ३५. | भारतीय संसदीय लोकशाहीतील विरोधी राजकीय .... | माधव साहेबराव गडदे | १०५ |
| ३६. | Opposition Party in India: Nature, Concept, Background & Importance | Sanket Sunilrao Shinde | ११२ |
| ३७. | Opposition Party in Parliament of India | Mr.Alzende Rekha D. | ११५ |
| ३८. | Duties & Responsibilities ofOpposition ... | Dr.Mohammed Khayyum | ११७ |
| ३९. | भारतीय लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिका | डॉ. निलेश रमेशराव निंबाळकर | १२० |
| ४०. | भारतीय संसदीय लोकशाहीतील विरोधी पक्षः....... | डॉ. काकासाहेब पोकळे | १२२ |
| ४१. | The Role & Responsibilities of Opposition in Parliamentary....... | Prof.P.M.Rathod<br>Prof.T.V.Munde | १२४ |
| ४२. | भारतीय लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिका | प्रा. घुमरे बडू पंडीतराव | १२६ |
| ४३. | भारतीय लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिका | प्रा. पोटभरे एस.डी. | १२९ |
| ४४. | भारतीय लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिका | डॉ. पंडीत शिवराम लांडगे | १३१ |
| ४५. | महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातील विरोधी पक्षः....... | प्रा. पी.जी.चव्हाण/ डॉ. देविदास भागवत | १३५ |
| ४६. | भारतीय लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिका | डॉ. एकनाथ खांदवे | १३७ |
| ४७. | लोकशाही शासनव्यवस्था आणि राजकीय पक्षाची अपरिहार्यता | प्रा. भालेराव जे.के. | १३९ |
| ४८. | भारतीय लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिका | प्रा. चौधरी के. पी. | १४१ |
| ४९. | लोकशाही आणि विरोधी पक्ष | प्रा. नवल पी. एम. | १४२ |
| ५०. | भारतीय संसदीय लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिका | प्रा. प्रशांत भोले / चि. अन्वय भोले | १४४ |
| ५१. | विरोधी पक्षाची भूमिका | डॉ. राजेंद्र नामदेव मोरे | १४६ |
| ५२. | लोकशाहीतील विरोधी पक्षाची कर्तव्य आणि जबाबदारी | श्री. इद्रजित भाऊराव जाधव | १४९ |
| ५३. | Role of Opposition Party in a Democracy | Prof.Acharya V. Dhondiram | १५३ |
| ५४. | भारतातील राजकीय पक्ष आणि विरोधी पक्षाची भूमिका | डॉ. सटाले सिध्देश्वर नामदेव | १५७ |
| ५५. | भारतीय लोकशाहीतील विरोधी पक्षाची संकल्पना | डॉ. मेश्राम एल.यू. | १६० |
| ५६. | भारतीय संसदीय लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिका | प्रा. पवार बी.टी. | १६२ |
| ५७. | भारतीय लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिका | प्रा. शिवाजी गायकवाड/प्रा. पी. के. दुनबले | १६३ |
| ५८. | लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिका | डॉ.प्रल्हाद नि.होंडे/डॉ.किशोर एस.सुर्यवंशी | १६६ |
| ५९. | लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिकाः ..... | प्राचार्य विठ्ठल एडके | १६८ |
| ६०. | संसदीय लोकशाहीत राजकीय पक्षाची भूमिक | डॉ. नारायण पोहकर | १५७ |
| ६१. | सत्तेच्या साठमारीतविरोधी पक्षांचे कुपोषण | संजय गोविंदराव शिंदे/ अर्चना तुकाराम गायकवाड | १७४ |
| ६२. | भारतीय राजकारणात विरोधी पक्ष : अपेक्षा व वास्तव | प्रा. प्रभाकर ग. जाधव | १७७ |
| ६३. | भारतीय संसदेतील विरोधी पक्षाची भूमिका | प्रा.इनकर विक्रम सोनाजी | १७९ |


Scanned with CamScanner

ISBN No. 978-1-945563-49-2

54

# भारतातील राजकीय पक्ष आणि विरोधी पक्षाची भुमिका

डॉ. सटाले सिध्देश्वर नामदेव
र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई
मो.नं. ९४२३५५९८९९

प्रस्तावना :-

राजकीय पक्षाला लोकशाही शासनाचा आधारभूत पाया किंवा प्राण मानले जाते. यावरुन लोकशाही शासनप्रणाली असलेल्या भारतात राजकीय पक्षांना किती महत्व आहे हे यावरुन आपल्या लक्षात येते. राजकीय पक्षाचा मुख्य उद्देश सत्ता संपादन करणे हा आहे. लोकशाहीत जनता आपले प्रतिनिधी राजकीय पक्षांच्या माध्यमातून निवडतात. ज्या पक्षाच्या उमेदवाराला जास्त मते मिळतात तो निवडून येतो. तसेच ज्या पक्षाला संसदेत, राज्य विधिमंडळात अथवा स्थानिक संस्थेत बहुमत प्राप्त होते. त्या पक्षाच्या हाती सत्ता जाते. सत्ता प्राप्तीसाठी राजकीय पक्षांना करावी लागणारी कार्ये पुढीलप्रमाणे :-

१) जनतेच्या इच्छा, आकांक्षा विचारात घेऊन विचारांना सैध्दांतिक बैठक प्राप्त व्हावी यासाठी पक्षाचा जाहीरनामा तयार करणे.

२) जनतेच्या मागण्या व अपेक्षा सुसंघटित करणे.

३) आपल्या पक्षाचा कार्यक्रम जनतेसमोर मांडूर त्यांचा विश्वास संपादन करणे.

४) लोकशाही शिक्षणाचे माध्यम असलेल्या राजकीय पक्षाला जनतेला राजकीयदृष्ट्या जागृत करणे.

५) आपल्या पक्षाचे संघटन मजबुत करण्यासाठी जनतेला राजकीय सहभागासाठी प्रेरित करणे.

६) चळवळीच्या मार्गाने लोकांना संघटित करुन त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे.

७) राजकीय नेतृत्व उभारणे इ.

राजकीय पक्षांचे महत्व :-

लोकशाहीत जनतेचा सहभाग, सतत जागरुकता, राजकीय शिक्षण या बाबी आवश्यक असतात. या लोकशाहीच्या प्रक्रियेतून राजकीय पक्षांची निर्मिती होते. म्हणून राजकीय पक्षांशिवाय लोकशाहीची कल्पना करता येणे शक्य नाही. म्हणून 'No Politics without Parties' असे म्हटले जाते. पक्षांमुळे शासनाच्या धोरणात एकवाक्यता निर्माण होण्यास व स्थिर शासन देण्यात मदत होते.

राजकीय पक्षांशिवाय प्रतिनिधी लोकशाहीची कल्पना आपणास करता येत नाही. डॉ.फायनरच्या मते, "राजकीय पक्षांच्या अभावी जनता एक तर नपुंसक बनेल अथवा असे धोरण स्वीकारील की ज्यामुळे संपूर्ण राजकीय यंत्रणाच उध्दवस्त होईल. "यावरुन लोकशाहीतील राजकीय पक्षांचे असलेले महत्व स्पष्ट होते. राजकीय पक्षाला लोकशाहीच्या रथाची चाके म्हणून ओळखले जाते.

संसदीय लोकशाही असलेल्या भारतात सत्तारुढ पक्षाला जितके महत्व आहे तितकेच महत्व विरोधी पक्षालाही आहे. ज्या राजकीय पक्षाची विचारसरणी जनतेला प्रेरित करते अथवा जवळची वाटते, त्या पक्षाला बहुमत प्राप्त होते. बहुमत प्राप्त पक्ष सत्तारुढ होऊन राज्यकारभाराची सूत्रे सांभाळतात. तर विरोधी पक्ष सत्तारुढ पक्षाच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करत असतील.

व्याख्या :- पक्षाची व्याख्या खालीलप्रमाणे सांगता येईल :-

१) फायनरच्या मते, "राजकीय पक्ष अमूर्त मतदाराला मूर्त स्वरुप देतात."

२) मॅक्स वेबर, "राजकीय पक्ष म्हणजे प्रचार व चळवळ यांच्या साहाय्याने राजकीय सत्ता संपादन करण्यासाठी एकत्र आलेला व्यक्तींचा समूह होय."

३) प्रा. गेटेल, "अधिक व्यापक व समावेशक स्वरुपात लोकमत तयार करुन शासकीय पातळीवर ते प्रत्यक्षात आणण्याचे कार्य करणारा गट म्हणजे राजकीय पक्ष होय."

४) एडमंड बर्क, "राजकीय तत्वज्ञानाच्या बाबतींत एक मत असलेला व संघटित रीतीने राष्ट्रीय हिंतसंबंधांची जपणूक करणारा लोकसमूह म्हणजे राजकीय पक्ष होय.



Scanned with CamScanner

वरील केलेल्या व्याख्यांवरुन राजकीय पक्षांची काही समान लक्षणे निश्चित करता येतील ती खालीलप्रमाणे
राजकीय पक्षाची लक्षणे :-

१) सनदशीर मार्गाचा अवलंब :- राजकीय पक्षांना जर आपली ध्येयधोरणे अंमलात आणायची असती तर त्यांनी सनदशीर, घटनात्मक मार्गांचा अवलंब केला पाहिजे. रक्तपात, हिंसा त्याज्य मानली पाहिजे.

२) राजकीय समूह :- राजकीय पक्षांचे सर्व सभासद सुसंघटित असतात. ते असे नसतील तर त्यांचा प्रभाव निर्माण होणार नाही.

३) राजकीय सत्ता प्राप्ती :- राजकीय पक्षांचे अंतिम ध्येय म्हणजे राजकीय सत्ता प्राप्त करणे व त्या मार्गाने समाजाचे कल्याण करणे हे असते. लोककल्याणाचे अनेक कार्यक्रम राजकीय सत्तेच्या आधारे ते आखीत असतात. समाजकल्याण हे ध्येय असते.

४)मूलभूत तत्वांबाबत एकमत :- राजकीय पक्षांत कार्य करणाऱ्या व्यक्तींनी मूलभूत तत्वांबाबत एकमत ठेवावे लागते. त्यांच्यात त्या बाबतीत मत भिन्नता असेल तर ते कार्यच करु शकणार नाहीत.

५) बहुविविधता :- जगात जिथे जिथे लोकशाही आहे. त्या देशात राजकीय पक्ष दोनापेक्षा अधिक संभवतात. वेगवेगळी ध्येयधोरणे, वेगवेगळे कार्यक्रम घेऊन ते जनतेला समोरे जात असतात. त्यातूनच बहुपक्षपध्दती निर्माण होते.

राजकीय पक्षाची लक्षणे

१. सनदशीर मार्गाचा अवलंब    २. सुसंघटीत समुह

३. राजकीय सत्ताप्राप्ती    ४. मूलभूत तत्वाबाबत एकमत

५. बहुविविधता

राजकीय पक्षांची कार्ये :-

राजकीय पक्षांशिवाय कोणतीही राज्यपध्दती आधुनिक युगात कार्ये करु शकतरी नाही. लोकशाही राजकीय पक्षांना अत्यंत महत्वाची कार्ये पार पाडावी लागतात. देशाचा विकास घडत असताना राजकीय पक्षांचे योगदान हे सर्वश्रेष्ठ असते. राजकीय पक्षांच्या कार्यामुळे राजकीय पक्षांचे महत्व वाढते. ही कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) लोकमत संघटित करणे :- आपल्या मताचा प्रत्येक राजकीय पक्ष सतत प्रचार करुन त्यामागे लोकमत संघटित करण्याचा प्रयत्न करीत असतात. सत्ताधारी राजकीय पक्ष हे आपली ध्येय धोरणे कशी योग्य आहेत हे पटविण्याचे कार्य करीत असतात. वृत्तपत्रे, प्रचार माध्यमे याद्वारे प्रसिध्दी मिळवून लोकमत संघटित करण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष करीत असतात.

२) निवडणुका लढविणे :- जगातील बहुतेक राष्ट्रांमध्ये सार्वत्रिक निवडणुकीत विशिष्ट पक्षाचा पाठिंबा असलेल्या व्यक्ती उमेदवार म्हणून उभ्या राहतात व निवडून येतात. निवडणूक प्रचाराला गती आणणे, निवडणुकीचे डावपेच आखून निवडणूक यशस्वी करण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष करतात.

३) कार्यक्रमाची आखणी, अंमलबजावणी करणे :- निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी त्याला निश्चित अशा कार्यक्रमांची आखणी करावी लागते. विरोधी पक्षही लोकमत जागे करणे, सरकारवर टीका करणे या धोरणाची अंमलबजावणी करतो.

४) राजकीय शिक्षण देणे :- जाहीर सभा, मिरवणुका, प्रचार, मेळावे यांच्या साहाय्याने जनतेस राजकीय शिक्षण देण्याचे कार्य राजकीय पक्षाकडून केले जाते. राजकीय शिक्षण देणाऱ्या शाळा म्हणजेच राजकीय पक्ष होत.

५) लोकांना राजकीय दृष्टीने सहभाग प्राप्त करुन देणे :- लोकांना राजकारणात व राज्यकारभारात सहभागी करुन घेणे हे फार महत्वाचे असते. शासन व्यवस्थेच्या ध्येयधोरणांची माहिती लोकांना देणे. त्यांच्या प्रश्नांची माहिती करुन घेणे. त्यासाठी सभा, संम्मेलने, शिबिरे या विविध माध्यमातून ते लोकांशी सतत संपर्क साधून असतात.

विरोधी पक्षाचे स्थान किंवा भूमिका : 'निंदकाचे घर असावे शेजारी' या न्यायानुसार विरोधी पक्षांकडे बघितले जाते. विरोधी पक्ष जेव्हा जागरुक, अभ्यासू सक्रिय असतील तेव्हा सत्तारुढ पक्षाने तत्परतेने, विश्वासात घेऊन जनहिताची कामे करावीत हे गृहीत धरलेले असते. त्यांच्या या कामाचे मूल्यमापन विरोधी पक्षांनी दाखविलेल्या सूचनांवर अवलंबून असते. विरोधी पक्ष सत्तारुढ पक्षाच्या केवळ चुकाच दाखवितात असे नाही तर विधायक सूचना आणि मार्गदर्शन करतो. लोकशाहीत ही रचना महत्वाची असते. मधू दंडवते, अशोक मेहता, आचार्य कृपलानी, मधू लिमये आणि (सध्या अटलबिहारी वाजपेयी सत्तेवर होते तरी) पूर्वीचे अटलबिहारी वाजपेयी जॉर्ज फर्नांडिस इत्यादी नेत्यांनी संसद गाजविली.



Scanned with CamScanner

ISBN No. 978-1-945563-49-2


विरोधी पक्षांचे कार्य १. मतदारसंघ स्तर, २. संसद स्तर आणि ३. लोकमत जागृती या तीन स्तरावर महत्वाचे असते. साधारणपणे विरोधी पक्ष पुढील कार्य करतात.

१. पर्यायी सरकार स्थापन करणे हे कार्य - सत्तारुढ पक्षावर अविश्वासाचा ठराव मंजूर झाल्यावर लगेच पर्यायी सरकार स्थापन करण्याची जबाबदारी विरोधी पक्षावर येते; परंतु तो पक्ष संघटित असावा लागतो. १७-४-१९९९ रोजी श्री. वाजपेयींनी राजीनामा दिल्यावर काँग्रेस पक्ष पर्यायी सरकार स्थापन करु शकला नाही ही आपली संसदीय लोकशाहीची शोकांतिका आहे.

२. सरकारवर नियंत्रण ठेवणे - विरोधी पक्ष सत्तारुढ पक्षाला नेहमी धारेवर धरतो, सत्य जाणून घेतो, अन्यायकारक कृती करण्यापासून परावृत्त करतो. त्यामुळे शासनाच्या मनमानी भूमिकेला आवर बसतो. इतक्याने भागले नाही तर अविश्वासाचा ठराव आणून सत्तारुढ पक्षाला सत्तेवरुन काढता येते.

३. सरकारला साहाय्य करणे - विरोधी पक्ष सत्तारुढ पक्षाला नेहमी विरोधच करतो असे नाही तर महत्वाच्या राष्ट्रीय सामाजिक किंवा आर्थिक प्रश्न सोडविण्यास मदत करीत असतात उदा. राखीव जागा चालू ठेवणे, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे, स्त्रियांच्या हितसंबंधाच्या बाबतीत कायदे करणे, महागाई रोखणे इत्यादी.

४. लोकमत जागृतीचे कार्य करतो - राजकीय सामाजिकीकरण करणे किंवा लोकमत जागृतीचे काम विरोधी पक्षांना सतत करावे लागते. आपापल्या मतदारसंघात जाऊन राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय प्रश्न जनतेला समजावून द्यावे लागतात. त्यासाठी दूरदर्शन, रेडिओ, भाषणे, व्याख्याने, परिसंवाद या मार्गांचा अवलंब करावा लागतो. त्या प्रक्रियेतून एक प्रकारे राजकीय शिक्षण मिळते आणि लोकशाही गतिमान होते.

५. अन्यायाला वाचा फोडणे - देशांतर्गत अनेक ठिकाणी अन्याय, जुलूम होत असतो. भ्रष्टाचार होत असतो. अत्याचार होत असतो. अशा ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन सत्य परिस्थिती जाणून घ्यावी लागते. ते प्रश्न विधिमंडळात आणि बाहेर मांडावे लागतात. संबंधितांना न्याय मिळवून द्यावा लागतो.



Scanned with CamScanner